NMC/PTC/OWL/२०१९/८६६

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## कर आकारणी विभाग

| | |
|---|---|
| आदेशाचे स्वरुप | सर्व भरणा केंद्र / नागरी सुविधा केंद्र सुरु ठेवणे बाबत. |
| आदेश | क्र. ११८ दिनांक 23/०८/२०१९. |
| विषय | करदात्यांच्या सोईकरीता सुट्टीच्या दिवशी भरणा केंद्र/ नागरी सुविधा केंद्र सुरु ठेवणे बाबत |
| संदर्भ | साप्ताहीक बैठक इतिवृत्त दि. १९/०८/२०१९. |
| अंमलबजावणी कालावधी | माहे १ सप्टेंबर २०१९ पासुन पुढील आदेश होईपावेतो. |
| कोणाच्या माहितीसाठी | कर आकारणी विभाग/ अधिक्षक अभियंता (सा.आ.अ. पाणीपुरवठा विभाग)/ लेखापरिक्षण विभाग/ वित्त व लेखा विभाग/माहिती तंत्रज्ञान विभाग/ राजशिष्टाचार व जनसंपर्क विभाग/ विभागीय अधिकारी/ जनसंपर्क अधिकारी/ वसुली सहाय्यक अधिक्षक/ सर्व वसुली लिपीक/ संगणक कार्यप्रणाली देखभाल दुरुस्ती, येस बँक (सॅनटेक सिस्टीम्स, नाशिक). |

नाशिक महानगरपालिकेचे मालमत्ता व पाणीपट्टी कर हे उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत असुन, सदर विभागांना देण्यात आलेले वसुली इष्टांक शंभर टक्के पुर्ण करणे बंधनकारक करणेत आले आहे. नाशिक मनपाचे मुख्यालय, विभागीय कार्यालय तसेच उप कार्यालयातील भरणा केंद्र /नागरी सुविधा केंद्र (CFC Center) द्वारे स्वीकारणेत येतो, सदरची सेवा मनपाचे माहिती व तंत्रज्ञान विभागा मार्फत नियुक्त येस बँकेमार्फत पुरविण्यात येत आहे.

सदरचे कार्यालयातील भरणा केंद्र हे सरकारी कामाच्या दिवशी सुरु असुन, सार्वजनिक सुट्टया, दुसरा शनिवार व चौथा शनिवार बंद असतात. त्यामुळे औद्योगिक वसाहतीतील मिळकतधारक व इतर नागरिक यांना असलेल्या सुट्टीच्या दिवशी कराचा भरणा करणेस शक्य असल्याने सदर कालावधीत मनपाचे भरणा केंद्र सुरु ठेवणे बाबत मागणी, करदात्यांकडुन वारंवार होत आहे.

तसेच नाशिक महानगरपालिकेने मा. स्थायी समिती ठराव क्र. ६५ दि. ०९/०८/२०१९ अन्वये मालमत्ता कराचे थकबाकीदारांकरीता अभय योजना सुरु करणेत आली आहे.

यासर्व बाबींचा विचार करता खालील प्रमाणे आदेश निर्गमित करणेत येत आहे.

१. दिनांक ०१ सप्टेंबर २०१९ पासुन ते पुढील आदेश होईपावेतो प्रतिमासिक दुसरा व चौथा शनिवारी सर्व भरणा केंद्र/नागरी सुविधा केंद्र (CFC Center),दोन्ही सत्रात (सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० पर्यंत) नियमित सुरु ठेवण्यात यावेत.

२. अभय योजना कालावधी दिनांक १६ सप्टेंबर २०१९ ते १५ ऑक्टोबर २०१९ अखेर येणारे सर्व शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टया इ. दिवशी, सर्व भरणा केंद्र / नागरी सुविधा केंद्र (CFC Center), दोन्ही सत्रात (सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० पर्यंत) सुरु ठेवण्यात यावेत.

३. भरणा केंद्र / नागरी सुविधा केंद्र हे उक्त कालावधीत सुरु रहातील, याबाबत माहिती व माहिती तंत्रज्ञान विभाग यांचेवर जबाबदारी निश्चित करणेत येत आहे. त्याबाबत सदर एजन्सीस आदेश निर्गमित करणेत यावे.

४. विभागीय कार्यालयांच्या अखत्यारितील भरणा केंद्र/नागरी सुविधा केंद्रांवरील विभागीय अधिकारी यांनी नियुक्त केलेला नियंत्रीत अधिकारी / कर्मचारी हे वरील कालावधीत पुर्णवेळे हजर रहातील, याबाबत विभागीय अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

५. विभागातील भरणा केंद्र/ नागरी सुविधा केंद्रांचा संपुर्ण एकत्रित भरणा प्रतिदिवशी सायंकाळी मनपाच्या विभागीय कार्यालयातील ट्रेझरी विभागात जमा करणेत येतो. सदरचे ट्रेझरी विभागातील अधिकारी/कर्मचारी हे उक्त कालावधीत हजर रहातील. नियंत्रीत कर्मचाऱ्यांकडुन कर्तव्य पारपाडणे, सदर कालावधीत भरणा वेळेत जमा करणे, हिशोब ठेवणे इ. जबाबदारी विभाग प्रमुख म्हणुन मुख्य लेखाधिकारी, वित्त व लेखा विभाग यांचेवर राहील.

वरिल कालावधीत भरणा केंद्र वेळेत सुरु राहतील याबाबत संपुर्ण जबाबदारी विभागीय अधिकारी यांची राहील.

सदर आदेशाचे जाहिर प्रकटन करदात्यांना माहिती होणेकामी सर्व स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करणेत यावी. तसेच याबाबत भरणा केंद्रांचे दर्शनी भागावर करदात्यांना माहिती करीता (कालावधी व वेळेचा) फ्लेक्स लावण्यात यावेत.

सदर आदेशाचे काटेकोरपणे अंमलबजावणी करणेत यावी.

(सही) 21/08/19

आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक

माहिती व तंत्रज्ञान विभाग
जा.क्र. ............. दिनांक / /२०
आ.क्र. १३४२ दिनांक २८/८/२०१९

Sr. Pandit - Pls publish on NMC website
२८/८/१९